# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २९/११/२०१६** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्र. १६९५**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/११/२०१६ ते दि.२२/११/२०१६ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/२४३० दि. २४/११/२०१६ चे पत्र.

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. १६९६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ च्या दि. १/१०/२०१६ ते दि.३१/१०/२०१६ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. समआ–३/६३२ दि. १९/११/२०१६ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १६९७**

मा.विष्णू हरीहर यांचे दि.१९/११/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.५९ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १ कोटी रुपयांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे .

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, १८.मुंढवा येथील पाण्याच्या पुर्नवापराची योजना, पान क्र.२०, XE 23D120 | १ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेली कामे –** | | |
| १) प्रभाग क्र.५९ब,गुरुवारपेठ ,गंजपेठ,अंगरशा तकीया, कस्तुरी चौक परिसरामधील ड्रेनेज लाईन टाकणे व साफसफाई करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | २५ लाख |
| २) प्रभाग क्र.५९ब,मधून जाणारा नाल्यातील साफसफाई करणे व तद्नुषंगिक कामे करणे | --- | २५ लाख |
| ३) प्रभाग क्र.५९ब,घोरपडेपेठ ,गुरुवारपेठ,मधील ड्रेनेज लाईन साफसफाई करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | २५ लाख |
| ४) प्रभाग क्र.५९ब,विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | २५ लाख |

**विषय क्र. १६९८**

मा.विकास दांगट व मा.सौ.संगिता कुदळे यांचे दि.२१/११/२०१६ चे पत्र.

सिंहगड रोड वरील विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्रा मध्ये प्रक्रियायुक्त झालेले मैलापाणी पंपिंग करून नजीकच्या तळजाई पठारावर वृक्ष संवर्धनासाठी पुरविणे. यासाठी आवश्यक तरतूद सन २०१७–२०१८ आर्थिक वर्षात करण्यात यावी.

**विषय क्र. १६९९**

मा.मिलिंद काची यांचे दि.२३/११/२०१६ चे पत्र.

**प्रभाग क्र.४९ ब येथे डॉ.कोटणीस आरोग्य केंद्र येथील संपादित केलेल्या जागेत सेन्ट्रल मेडिकल स्टोअरकरिता इमारतीचे उर्वरित काम करणेसाठी** र.रु. **६०** लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे .

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक,<br>१)**बजेट कोड - सीई१७ए२४२/एसजे६-९, प्रभाग क्र.४९ ब येथील मनपा शाळा क्र २४ ब वॉचमन क्वार्टर्सचे उर्वरित काम व तदनुषंगिक कामे करणे.**<br>**२) बजेट कोड - सीई१७ए२४२/एसजे६-९, प्रभाग क्र.४९ ब येथील शुक्रवार पेठ घरांक ६१० येथे बहुउद्देशीय इमारत विकसित करणे.**<br>**३) बजेट कोड - सीई२२ए४५८/एसजे१९-२८, प्रभाग क्र.४९ ब मध्ये मनपाच्या जागेमध्ये बहुउद्देशीय इमारत विकसित करणे.**<br>**४) बजेट कोड - सीई२२ए३८१/एसजे११-४२, प्रभाग क्र.४९ ब मध्ये मनपा शाळेत विविध विकास कामे करणे.** | **१०** लाख<br>**१०** लाख<br>**२०** लाख<br>**२०** लाख | **---**<br>**---**<br>**---**<br>**---** |
| नविन सुचविलेले काम<br>**प्रभाग क्र.४९ ब येथे डॉ.कोटणीस आरोग्य केंद्र येथील संपादित केलेल्या जागेत सेन्ट्रल मेडिकल स्टोअरकरिता इमारतीचे उर्वरित काम करणे.** | --- | **६०** लाख |

( मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी. )

**विषय क्र. १७००**

मा.ॲड्.किशोर शिंदे यांचे दि.२४/११/२०१६ चे पत्र.

**प्रभाग क्र.२८ ब मध्ये खालील विकास कामे करण्यासाठी र.रुपये ५० लाखाचे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात यावे.**

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१६–२०१७ चे अंदाजपत्रक, बजेट कोटः.सीई२०अे ८८४/एसअे१०–१२७, प्रभाग क्र.२८ ब मधील स.नं.८२ येथे उद्यान विकसित करणे. | ५० लाख | ----- |
| **नविन सुचविलेले काम**<br>Design, Supply and Installation Of 7D Amusement Ride at Ward No.28 kothrud, Pune. | --- | **५० लाख** |

**विषय क्र. १७०१**

मा.फारुक इनामदार यांचे दि.२४/११/२०१६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.६०,दि.१२.४.२०१६( मा.कार्यकारी अभियंता क्र.३ पथ विभाग यांच्या कार्यक्षेत्रातील औंध व घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत मुख्य रस्ते रिसर्फेसिंग करणे व इतर तदअनुषंगिक कामे करणे) चा फेरविचार करण्यात येऊन प्रभाग क्र.९ मधील बाणेर भागातील अपूर्ण रस्ते मे.एस.के.येवले अँड कंपनी या ठेकेदाराकडून पूर्ण गणकपत्रक रकमे पर्यंत म्हणजेच रक्कम रुपये ५,९९,९९,३६३/– पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील भाव वाढ व विशेश भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १७०२**

मा.फारुक इनामदार व मा.सुनिल गोगले यांचे दि.२४/११/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.४५ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ४.४५ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे .

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, सार्वजनिक वाहतुक सुधारणा व विशेष प्रकल्प विभागा मार्फत करावयाची कामे पान क्र.१/२ अ.क्र.१० हांडेवाडी ( ससाणेनगर) येथे रेल्वे उड्डाण पूल बांधणे. | ४.४५ कोटी | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे -</u>** | | |
| १)प्रभाग क्र.४५ अ मध्ये पालखी मार्ग नाला कलव्हर्ट करणे. | --- | २ कोटी |
| २) प्रभाग क्र.४५ अ मध्ये काळेपडळ,कृष्णानगर,महमंदवाडी परिसरात रस्ते कॉंक्रीट करणे,ब्लॉक बसविणे, | --- | १ कोटी |
| ३) प्रभग क्र.४५ अ मध्ये गार्डन विकसित करणे | --- | २० लाख |
| ४) प्रभग क्र.४५ अ मध्ये जलतरण तलाव विकसित करणे | --- | २० लाख |
| ५) प्रभाग क्र.४५ अ मध्ये विविध ठिकाणी भूमिगत विद्युत केबल टाकणे | --- | १५ लाख |
| ६) प्रभाग क्र.४५ अ मध्ये विविध ठिकाणी भूमिगत विद्युत केबल टाकणे | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र.४५ अ मध्ये विविध ठिकाणी मार्केट बांधणे | --- | १५ लाख |
| ८) प्रभाग क्र.४५ अ मध्ये विविध ठिकाणी मार्केट बांधणे. | --- | १० लाख |
| ९) प्रभाग क्र.४५ अ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे | --- | १० लाख |
| १०) प्रभाग क्र.४५ अ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ११) प्रभाग क्र.४५ अ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे | --- | ५ लाख |
| १२) प्रभाग क्र.४५ अ मध्ये डुक्कर पकडणे कामी व्यवस्था करणेसाठी | --- | १० लाख |
| १३) प्रभाग क्र.४५ अ पाण्याची लाईन दुरुस्ती विषयक कामे करणे | --- | १० लाख |

( मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी. )

**विषय क्र. १७०३**

मा.अशोक हरणावळ व मा.अविनाश बागवे यांचे दि.२४/११/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ५७ ब मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळयास सुरु असलेल्या मेघडंबरीचे उर्वरित काम करणेसाठी र.रुपये १७.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ अंदाजपत्रक, बजेट कोड क्र. CE17A192/S25- 273+, प्रभाग क्र. ५७ ब पर्वती दर्शन येथे मित्रमंडळ चौकात पुणे मनपा येथील धोकादायक झालेला दवाखाना पाडून तीन मजली नविन दवाखाना बांधणे. | १७.५० लाख | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u><br>प्रभाग क्र. ५७ ब मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळयास सुरु असलेल्या मेघडंबरीचे उर्वरित काम करणे | --- | १७.५० लाख |

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १७०४**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सन २०१६-१७ मधील सह महापालिका आयुक्त, परिमंडळ ३ यांचे पत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची मासिक यादी (माहे ऑक्टोंबर २०१६) माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. समआ-३/६५० दि.२३/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७०५**

मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षण संचलनालय, मुंबई यांनी आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिकेकडील वित्तीय वर्ष सन २०१२-२०१३ याबाबत काढलेल्या आक्षेपांच्या पुर्ततेसाठी करण्यात आलेला अनुपालन अहवालास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/७६६ दि.२३/११/२०१६ चे पत्र.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १७०६**

पुणे महानगरपालिकेच्या उप आयुक्त (झोनिपु) कार्यालयाकडील चाळ विभागाकडे प्रत्यक्ष कामास व वेतनास असलेल्या श्री.राकेश यल्लप्पा विटकर, हुद्दा – वरिष्ठ लिपीक यांच्या निलंबनास दि. २९/९/२०१६ रोजी पहिली सहामाही पूर्ण झाली असून सदर बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/७६३ दि.२३/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७०७**

पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागातील श्री.रमेश वामनराव शेलार, मुख्य सुरक्षा अधिकारी (वर्ग–१) यांचे तिसरी सहामाही दि. २३/२/२०१६ पासून दि.२२/८/२०१६ रोजी पूर्ण होत असून सदर पूर्ण होणारी सहामाही मनपा सेवा विनियम मधील प्रकरण ६ वे क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/७६४ दि.२३/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७०८**

पुणे महानगरपालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त, औंध क्षेत्रिय कार्यालयाकडे कामास असलेले सेवक श्री.दिनशे जुम्मन गोडाले, हुद्दा मेहतर यांची दि. ४/८/२०१४ ते ३/२/२०१५ पहिली, दि. ४/२/२०१५ ते ३/८/२०१५ दुसरी, दि. ४/८/२०१५ ते ३/२/२०१६ तिसरी, दि. ४/२/२०१६ ते ३/८/२०१६ पर्यंत चौथी सहामाही पूर्ण झाली असून सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/७६५ दि.२३/११/२०१६ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १७०९**

पुणे मनपा शिक्षण मंडळाचे सन २०१७–२०१८ चे मूळ अंदाजपत्रकाबाबत मा.शिक्षण मंडळ ठराव क्र. १३८ दि. २९/८/२०१६ वर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११९३ दि. ६/९/२०१६ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/मुले/७६२ दि. २३/११/२०१६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. १७१०**

प्रभाग क्र. २५ ब मध्ये हनुमाननगर, येथील पांडवनगर पोलिस चौकी समोरील रस्ता, मंजाळकर चौक ते गोलंदाज चौक ते होमीभाभा हॉस्पिटल रस्त्यापर्यंतचा रस्ता यु.टी.डब्लू.टी. करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,५६,७५,८१९/– पेक्षा १९.५७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,०६,५१,०६१=२२ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७६७ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७११**

प्रभाग क्र. १८ बिशप शाळा ॲरनॉल शाळा दरम्यान सेंट जोसेफ कॉलनी सोमनाथ नगर ते वडगाव शेरी भाजी मंडई रस्ता पुर्नडांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६२,९९,९५७/– पेक्षा १८.८१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५१,१४,९३५=०८ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७६९ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१२**

प्रभाग क्र. २१ मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शांती कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९९,९७४/– पेक्षा २२.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,७४,९७९=८५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७० दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१३**

प्रभाग क्र. २१ मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनशाईन व्हेंचर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८०,००,०००/– पेक्षा १७.७९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६५,७६,८००/– पैकी उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७१ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१४**

प्रभाग क्र. ४७ ब विविध ठिकाणी मिलिंग करुन डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.धनराज अस्फाल्ट कं. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. २९,९९,९२८/– पेक्षा ८.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,४४,९३४=१२ पैकी उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७२ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१५**

प्रभाग क्र. २१ मध्ये वाडीया कॉलेज ते जहांगीर फुटपाथ करणे व प्रभाग क्र. २१ मध्ये पुणे सेन्ट्रल ते वाडीया कॉलेज फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अभिजीत एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,००,००,०००/– पेक्षा २०.५७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७९,४३,०००/– पैकी उपलब्ध तरतुदीप्रमाणे काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७३ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१६**

मालधक्का चौक ते नवीन जिल्हा परिषद रस्ता पुर्न:डांबरीकरण व पुर्न:विकसन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९४,४९,९६६/– पेक्षा १.४९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९३,०९,१६१=५० पैकी उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७४ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१७**

प्रभाग क्र. ६ ब मध्ये गावठाण रोड, हिंदु स्मशानभुमी रोड, महादेव मंदिर रोड, गंगाराम पार्क, शेवाळे हॉस्पीलट व इतर विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोतीलाल धुत सॅण्ड ॲण्ड स्टोन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,९९,७२६/– पेक्षा २७.५३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६५,२२,१०१=४३ पैकी उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७५ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१८**

प्रभाग क्र. ४९ अ मध्ये विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. २९,९६,१३९/– पेक्षा ४.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,४९,३२८=१८ पैकी उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७६ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७१९**

प्रभाग क्र. ७३ अ मध्ये बालाजी नगर रविकिरण हॉटेल येथील रस्ते विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.त्रिमुर्ती स्टोन मेटल कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६७,४९,९८९/- पेक्षा १८.६५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५४,९१,११६=०५ पैकी उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७७ दि.२४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७२०**

गोटीराम भैया चौक ते गोविंद हलवाई चौक रस्ता पुन:डांबरीकरण व पुन:विकसन करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ३३,०७,२१०/- पेक्षा ४.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,४५,१५६=७१ पैकी उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७८ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७२१**

होळकर जलकेंद्र येथे सिमाभिंत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आयुष एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,६०,०३०/- पेक्षा १८.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०,१७,६२९=२६ उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/७७९ दि. २४/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १७२२**

प्रभाग क्र. २६ मधील दुरदर्शन ते किमया हॉटेल दरम्यान असलेल्या नाल्यांची दुरुस्ती व साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५९,९९,९४१/- पेक्षा २७.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४३,२०,५५७=५१ पैकी उपलब्ध तरतुदी पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/७८० दि. २४/११/२०१६ चे पत्र.

## संकिर्ण

**विषय क्र. १७२३**

मा.अशोक हरणावळ व मा.अविनाश बागवे यांचे दि.२४/११/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ५७ ब मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळयास सुरु असलेल्या मेघडंबरीचे उर्वरित काम करणेसाठी र.रुपये २४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१४-१५ चे अंदाजपत्रक, बजेट कोड क्र. CE28A221+, व्यंगचित्रकार कै.बाळासाहेब ठाकरे कलादालनाचे उर्वरित काम करणे व तद्नुषंगिक कामे करणे | २४ लाख | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u><br>प्रभाग क्र. ५७ ब मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळयास सुरु असलेल्या मेघडंबरीचे उर्वरित काम करणे | --- | २४ लाख |

**विषय क्र. १७२४**

मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.दिपक बोडके, अध्यक्ष, स्थायी समिती यांचे दि.२४/११/२०१६ चे पत्र.

केंद्रीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोग लागू करण्यात आला असून त्याचे नोटीफिकेशन केंद्र सरकारने २५ जुलै २०१६ रोजी काढण्यात आले आहे. सदरचा वेतन आयोग हा १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिका सेवकांनासुध्दा सातवा वेतन आयोग लागू आहे. परंतू त्यांच्यासाठी सादर करण्यात आलेल्या नोटीफिकेशननुसार प्रशासन मा.सभासदांची एक वेतन आयोग समिती गठन करत असते आणि सदरची गठीत करण्यात आलेली समिती केंद्र सरकारने सादर केलेल्या नोटीफिकेशननुसार त्यातील वेतन संरचना तसेच इतर भत्ते याबाबत

विचारविनिमय करुन तशा स्वरुपाची शिफारस स्थायी समितीला सादर करत असते. स्थायी समिती त्याच्यावर चर्चा करुन निर्णय घेत असते तदनंतर सदरचा विषय मनपा मुखय सभेमध्ये अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येतो.

सदरच्या संपूर्ण कार्यपध्दतीसाठी बराच अवधी लागत असतो त्यामुळे मनपा सेवकांना वेतन आयोग प्रत्यक्षात लागू होण्यासाठी विलंब होत असतो. मागील ६ वा वेतन आयोग लागू होण्याच्या अगोदर मनपा सेवकांना त्यावेळच्या जुन्या बेसिकवर १०% अंतरिम वाढ देण्यात आली होती. त्याच धर्तीवर सातव्या वेतन आयोगाच्यापोटी दि.१/१/२०१६ रोजी असलेल्या बेसिकवर १०% अंतरिम वाढ दि. १/१/२०१६ पासून दिल्यास मनपावरील भविष्यामध्ये पडणारा आर्थिक बोजा कमी होण्यास मदत होणार आहे.

तरी पुणे मनपा सेवकांना दि. १/१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाच्यापोटी दि. १/१/२०१६ रोजी असलेल्या बेसिकवर १०% अंतरिम वाढ देण्यात यावी. सातव्या वेतन आयोगापोटी सन २०१६–१७ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे.

**विषय क्र. १७२५**

मा.सौ.सुमन पठारे व मा.फारुक इनामदार यांचे दि.२४/११/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तुमध्ये ग्रीन रुम,बैठक व्यवस्था व सुशोभिकरण करणे या प्रकल्पांच्या उदघाटनअंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | खर्चाचा तपशिल |
|---|---|---|
| १) | सुप्रसिध्द गायक महेश कांबळे यांचा गाण्यांचा कार्यक्रम वाद्यवृंद कलाकार इ.सह आयोजित करणे त्यासाठी गायक मा.महेश कांबळे यांना संपूर्ण कार्यक्रमाचे मानधन देणे | र.रु.३,५०,०००/- |
| २) | आमंत्रण पत्रिका डिझाईन,लाईव्ह व्हिडीओ साउंड सिस्टिम,प्रमोशनल व्हिडीओ,फिल्म,इ.सह संपूर्ण इव्हेंट साकेत कम्युनिकेशन यांच्याकडून पूर्ण करणे. | र.रु.३,००,०००/- |

तरी सदर कार्यक्रम आयोजित करणेस व त्याप्रित्यर्थ येणाऱ्या र.रु.६,५०,०००/– पर्यंतचा खर्च करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १७२६**

पुणे महानगरपालिकेच्या २४X७ समान पाणीपुरवठा योजने करीता आवश्यक कर्ज/कर्जरोखे उभारणे व या कामासाठी तांत्रिक सल्लागार व मर्चंट बँकर यांची नेमणूक करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७६८ दि.२४/११/२०१६ चे पत्र.

१. २४X७ समान पाणीपुरवठा प्रकल्पासाठी र.रु.२२६४ कोटी पर्यंत कर्ज/कर्जरोखे उभारणेस
२. २४X७ समान पाणीपुरवठा प्रकल्पासाठी एस.बी.आय.कॅपीटल मार्केटस लि. यांची तांत्रिक सल्लागार तथा मर्चंट बँकर म्हणुन नेमणुक करण्यास व पुणे महानगरपालिका जेवढया रकमेचे कर्ज रोखे उभारेल त्याच्या ०.०५%(सर्व करासहीत) इतकी फी आदा करणेस, तसेच याचबरोबर सदर प्रक्रियेमध्ये इतर अनेक मध्यस्थांकडून (Other Intermediaries to the Issue) विविध कामे करुन घेणेसाठी त्यांची नेमणूक करणे व त्यांचा मुशाहिरा आदा करणेस
३. २४X७ समान पाणीपुरवठा प्रकल्पासाठी कर्ज/कर्जरोखे उभारणी करताना सदर प्रकल्पाचे काम हे पुढील ५ वर्षामध्ये टप्याटप्याने पूर्ण करावयाचे असल्याने एकाच वेळी निधीची आवश्यकता नसल्याने त्या आर्थिक वर्षामध्ये होणारे काम व त्यासाठी आवश्यक असणा-या निधीची गरज यांचे नियोजन करुन त्यानुसारच आवश्यक त्या रकमेपर्यंत कर्ज/कर्जरोखे स्वरुपात निधी उभारणेस, सदर प्रक्रियेमध्ये होणारे आवश्यक कामकाज, करार व त्या अनुषंगाने होणारी सर्व तदनुषंगिक कामे व यासाठी होणारा खर्च, तसेच सदर कामकाजाच्या मान्यतेसाठी शासनाकडे करावा लागणारा पाठपुरावा इ.साठीचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**